# मध्वाचार्य-कृत ‘ मायावाद–खंडन ’

## प्रस्तावना

आद्य शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान केवलाद्वैत वेदान्त या नावाने प्रसिद्ध आहे; त्यात माया किंवा अविद्या या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. निर्गुण ब्रह्म हे जगाचे विवर्त–कारण आहे, जग मिथ्या आहे, जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य आहे आणि भेद हा खोटा असून, ब्रह्म हे एकमेव अद्वितीय सत्य तत्त्व आहे, असे शंकराचार्यांच्या मायावादातील मुख्य सिद्धांत आहेत. आणि जरी हा मायावाद लोकप्रिय झाला होता, तरी त्याला विरोध करणारे काही तत्त्वज्ञ होतेच.

## खंडन–त्रय

श्री शंकराचार्य–प्रणीत तत्त्वज्ञानाच्या विरोधात उभे राहाणाऱ्यांमध्ये मध्वाचार्य हे एक होते. ते ज्यावेळी आपल्या अच्युतप्रेक्ष नावाच्या गुरूजवळ ‘ इष्टसिद्धि ’ हा ग्रंथ शिकत होते, तेव्हापासूनच त्यांना मायावादातील अनेक दोष दिसू लागले होते व त्यांचा निर्देशही ते करू लागले होते. पुढे त्यांनी आपला द्वैत–संप्रदाय स्थापन केला. द्वैत–वेदान्ताचे सिद्धांत सांगण्यास त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्याचे जोडीने केवलाद्वैत–मताचे खंडन करण्यास त्यांनी ‘ खंडन–त्रय ’ या शीर्षकाखाली येणारे मायावाद–खंडन, उपाधि–खंडन आणि प्रपंच–मिथ्यात्व–अनुमान–खंडन हे छोटेसे तीन ग्रंथ लिहिले. त्यापैकी ‘ मायावाद–खंडन ’ हे लहानसे प्रकरण येथे प्रस्तुत केले आहे.

## मध्वाचार्यांचे तत्त्वज्ञान

मध्वाचार्यांच्या मायावाद–खंडनाकडे वळण्यापूर्वी त्यांचे तत्त्वज्ञान संक्षिप्तपणे पाहाणे हे उपयुक्त ठरेल. हे तत्त्वज्ञान असे आहे. स्वतंत्र आणि अस्वतंत्र अशी दोन तत्त्वे आहेत. अस्वतंत्र तत्त्व हे संपूर्णपणे स्वतंत्र तत्त्वावर अवलंबून असते; याउलट

स्वतंत्र तत्त्व हे कशावरही अवलंबून नसते. हे स्वतंत्र तत्त्व म्हणजेच नारायण / विष्णु होय; त्यालाच ब्रह्म म्हटले जाते (ब्रह्मशब्दश्च विष्णौ एव ।). हा विष्णु नित्य, सर्वदा निर्दोष, सर्वगुण-संपन्न व सर्वश्रेष्ठ आहे. इंद्र, चंद्र, अग्नि, इत्यादि त्याचीच नावे आहेत. सर्व-व्यापकत्व, सर्व-नियामकत्व, सर्वान्तर्यामित्व, सर्वाधारत्व, अगण्य-गुण-युक्तत्व, इत्यादींमुळे विष्णु हा सर्व-तंत्र-स्वतंत्र आणि सर्वोत्तम आहे. तोच जीवांना बंध-मोक्ष देणारा आहे; विश्वोत्पत्ति ही त्याची लीला आहे. धर्माला ग्लानि आली असता विष्णु अवतार घेतो; त्याचे सर्व अवतार पूर्ण असतात.

विष्णूखेरीज उरलेली सर्व तत्त्वे-प्रकृति, काल, जीव, जग इत्यादी ही पूर्णपणे विष्णूवर अवलंबून आहेत. जड जगत् हे विष्णूपेक्षा भिन्न असून ते सत्य आहे. 'मी' या स्वरूपात जो कळून येतो तो जीव होय. जीव अनंत आहेत. ते विष्णूपेक्षा भिन्न असून सत्य आहेत. ते परस्परापेक्षा भिन्न असून ते जड तत्त्वापेक्षाही भिन्न आहेत. मोक्षातही जीव भिन्नपणाने रहातात. ईश्वराच्या प्रसादाने जीवाला मोक्ष मिळतो.

सर्व तत्त्वे सत्य आहेत व ती परस्परापेक्षा भिन्न आहेत. विष्णु-जग, विष्णु-जीव, जीव-जड, जीव-जीव आणि जड-जड यातील पाचही प्रकारचा भेद सत्य आहे. हे मध्वाचार्यांचे तत्त्वज्ञान शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाला संपूर्णपणे विरोधी आहे, हे अगदी स्पष्ट आहे. मायावाद सांगणाऱ्या केवलाद्वैतशास्त्राला असणारा आपला विरोध मध्वाचार्यांनी प्रस्तुत मायावाद-खंडनात व्यक्त केला आहे.

## मायावाद-खंडनाचे स्वरूप

मायावाद-खंडन म्हणजे मायावादाचे खंडन. येथील 'मायावाद' शब्दाने मध्वाचार्यांना आद्य शंकराचार्यांचा मायावाद अभिप्रेत आहे. तथापि हे शीर्षक फसवे आहे. कारण येथे शंकराचार्यांच्या 'माया' या संकल्पनेचे साक्षात् खंडन नसून, मायावाद सांगणारे केवलाद्वैतशास्त्र हे निरर्थक असल्याने, ते अभ्यासण्यास योग्य नाही असे दाखवून, नंतर आपले द्वैतमतच कसे श्रुति-स्मृतीला मान्य आहे, हे मध्वाचार्यांनी दाखविले आहे.

मायावाद-खंडनाच्या पहिल्या श्लोकात विष्णूच्या 'नरसिंह' या अवताराला वंदन आहे आणि अंतिम श्लोकात 'मी मायावादी मत निरस्त केले आहे', असे म्हटले आहे. उरलेल्या मधल्या भागाचे दोन खंड पडतात- (अ) (२) ते (१०) या खंडांत केवलाद्वैत-शास्त्र हे अध्ययन करण्याच्या लायकीचे नाही असे निरनिराळे युक्तिवाद करून दाखविले आहे. (आ) (११) ते (१५) या खंडात द्वैत-मतच

श्रुति-स्मृतीला मान्य आहे असे दाखविले आहे. तसे करताना, मध्वाचार्यांनी ब्रह्म-सूत्र ग्रंथातील एक सूत्र, कठ उपनिषदातील दोन श्लोक आणि भगवद्गीतेतील पाच श्लोक जसेच्या तसे उद्धृत केले आहेत.

मायावादखंडन या ग्रंथाची भाषा अनेकदा सूत्र-ग्रंथांतील सूत्रांप्रमाणे अल्पाक्षर आणि संक्षिप्त आहे; त्यामुळे बहुतेक वेळी जरूर त्या शब्दांचा अध्याहार करणे आवश्यक ठरते. या प्रकरणातील खंडनात पूर्वपक्ष व उत्तरपक्ष ही वाद-पद्धति अभिप्रेत आहे. तसेच पूर्वपक्षाचे मत वाचकांना माहीत आहे असे अनेकदा गृहीत धरलेले आहे. तसेच अनेकदा पूर्वपक्षी असे असे विकल्प मांडेल असे गृहीत धरून त्या विकल्पांचे खंडन केलेले आहे.

## खंडनाचा मुख्य रोख

केवलाद्वैतशास्त्राचे अध्ययन करू नये असे दाखविण्याकडे मध्वाचार्यांचा रोख आहे. याचे कारण म्हणजे या शास्त्राच्या संदर्भात शास्त्राभ्यास सुरू करण्यापूर्वी पाहिले जाणारे चार अनुबंध शक्यच नाहीत. हे चार अनुबंध असे-शास्त्रात ज्याचे मुख्यत: प्रतिपादन केले जाते तो त्या शास्त्राचा प्रतिपाद्य विषय होय; विषय हा पहिला अनुबंध. ते शास्त्र व त्यातील विषय यात प्रतिपाद्य-प्रतिपादक-भाव किंवा बोध्य-बोधक-भाव असणे म्हणजे संबंध; संबंध हा दुसरा अनुबंध. त्या विशिष्ट शास्त्राची अध्ययन करण्याची ज्याची पात्रता आहे, तो अधिकारी; तो अधिकारी हा तिसरा अनुबंध आणि त्या शास्त्राच्या अध्ययनाने जे फळ प्राप्त होणार असेल, ते त्या शास्त्राचे प्रयोजन होय; प्रयोजन हा चौथा अनुबंध. मध्वाचार्यांच्या मते हे चारही अनुबंध केवलाद्वैतशास्त्राच्या बाबतीत शक्य नाहीत. म्हणून हे शास्त्र अध्ययन करण्याच्या लायकीचे नाही; म्हणून या शास्त्राचे अध्ययन सुरूच करू नये.

आता, यापुढे मायावाद खंडनाची मूळ संस्कृत संहिता, तिचे मराठी भाषांतर आणि नंतर स्पष्टीकरण दिलेले आहे.

° ° °

**मूळ**– नरसिंहोऽखिलाज्ञान-मत-ध्वान्त-दिवाकरः ।
जयत्यमित-सज्ज्ञान-सुख-शक्ति-पयोनिधिः ॥१॥

**भाषांतर**– जो नरसिंह संपूर्ण अज्ञान (-युक्त) सिद्धांत-रूपी (मत) अंधकाराचा (ध्वान्त) नाश करणारा असा सूर्य आहे, आणि जो अमर्याद (अमित) अशा सम्यग्/सत्य ज्ञान, निर्भेळ सुख, आणि अप्रतिहत शक्ति यांचा (अपरंपार असा) सागर आहे, असा नरसिंह विजयी आहे. (१)

**स्पष्टीकरण**– प्राचीन ग्रंथकारांच्या प्रथेप्रमाणे मध्वाचार्यांनी या पहिल्या श्लोकात मंगलाचरण केले आहे. येथे नरसिंह विजयी आहे असे म्हटले आहे. जो विजयी असतो, तो सर्वश्रेष्ठ असतो. जो सर्वश्रेष्ठ असतो, तो पूज्य । वंदनीय असतो. म्हणून येथे ' जयति ' शब्दाने ' मी नरसिंहाला वंदन करतो ', असा अर्थ प्राप्त होतो.

नरसिंह म्हणजे हिरण्यकशिपु नामक दैत्याचा वध करण्यास विष्णूने घेतलेला अवतार होय. मध्वाचार्यांच्या मते विष्णूचे अवतार हे विष्णूप्रमाणेच पूर्ण असतात. तेव्हा येथे नरसिंह म्हणजे विष्णू असे म्हणण्यास हरकत नाही.

अज्ञान–मत म्हणजे अज्ञान–युक्त सिद्धांत म्हणजे अज्ञानामुळे मानली गेलेली मते किंवा अज्ञानामुळे स्वीकारले गेलेले चुकीचे सिद्धांत किंवा या शब्दाचा दुसरा अर्थ असा–ज्या मतात/सिद्धांतात अज्ञान ( = अविद्या) मानले गेले आहे ते मत. म्हणजे ज्या तत्त्वज्ञानास ' ब्रह्मस्वरूप असणारे जीव आणि जग हे अज्ञानामुळे भिन्न मानले जातात ', ते तत्त्वज्ञान म्हणजेच शंकराचार्यांचे केवलाद्वैत–मत. हा उत्तरोक्त अर्थ येथे अभिप्रेत दिसतो. कारण प्रस्तुत ग्रंथात मध्वाचार्य केवलाद्वैत–शास्त्राचा फोलपणा दाखविण्यास सिद्ध झाले आहेत.

मध्वाचार्यांच्या तत्त्वज्ञानात विष्णु (नरसिंह) हा सर्वोत्तम आहे; जीव आणि जग हे विष्णूपेक्षा भिन्न असून ते सत्य आहेत. या सिद्धांताने शंकराचार्यांच्या केवलाद्वैत–मताचा निरास होतो. म्हणून अज्ञान–युक्त सिद्धांतरूपी अंधकाराचा निरास करणारा नरसिंह हा जणु अंधकार दूर करणारा सूर्य आहे असे म्हटले आहे.

' अमित ...पयोनिधिः ' या दीर्घ समासात, ' अमित ' हा शब्द ज्ञान, सुख आणि शक्ति या तिघांचेही विशेषण आहे; तसेच तो शब्द ' पयोनिधि ' या शब्दाचेही विशेषण आहे. त्यामुळे ज्ञान, सुख, शक्ति आणि सागर हे अमर्याद / अपरंपार आहेत हे कळते. विष्णु/नरसिंह हा अमर्याद ज्ञान, सुख व शक्ति यांनी युक्त आहे. तसेच, या समासातील ' सत् ' हा शब्दही ज्ञान, सुख व शक्ति या तिघांचेही विशेषण आहे. म्हणून सत् ज्ञान म्हणजे सम्यग् / सत्य ज्ञान, सत् सुख म्हणजे निर्भेळ सुख, दुःखाशी न मिसळलेले सुख आणि सत् शक्ति म्हणजे अप्रतिहत शक्ति असे अर्थ होतात.

अशा प्रकारे या पहिल्या श्लोकात मध्वाचार्यांच्या तत्त्वज्ञानातील विष्णु या अंतिम तत्त्वाचे स्वरूप संक्षेपाने आले आहे.

**मूळ**– विमतमनारम्भणीयम् । अन्यथा प्रतिपादकत्वात् । यदित्थं तत्तथा । यथा संप्रतिपन्नम् ॥२॥

**भाषांतर**– (अंतिम तत्त्व, मोक्ष इत्यादिविषयी) विवादास्पद मते मांडणारे शास्त्र (विमत) (म्हणजे त्या शास्त्राचे अध्ययन) सुरू करू नये. (किंवा ते सुरू करण्यास योग्य नाही); कारण ते (सत्य गोष्टी) वेगळ्या म्हणजेच चुकीच्या पद्धतीने (अन्यथा) प्रतिपादन करते. जे (शास्त्र) असे (=चुकीचे प्रतिपादन करणारे) असते, ते तसे (=सुरू करण्यास अयोग्य) असते. जसे :– (आमच्या केवलाद्वैती विरोधकांनी) स्वीकारलेले शास्त्र. (म्हणून केवलाद्वैती विरोधकांना मान्य असणाऱ्या शास्त्राचे अध्ययन सुरू करू नये. (२)

**स्पष्टीकरण**– प्रस्तुत प्रकरणात ‘माया’ संकल्पना ही खंडनाचा विषय नसून मायावाद मांडणारे केवलाद्वैतशास्त्र हे खंडनाचा विषय आहे, हे या वाक्यावरून कळते.

‘विमत’ म्हणजे ज्या शास्त्राच्या अध्ययनाविषयी भिन्न मते निर्माण झाली आहेत, ज्या शास्त्राचे अध्ययन विवादास्पद आहे, असे शास्त्र. अशा शास्त्राविषयी वरील (२) मध्ये मध्वाचार्यांनी पुढील अनुमान मांडले आहे. : ‘विमत’ अशा शास्त्राचे अध्ययन सुरू करू नये (प्रतिज्ञा); कारण ते चुकीच्या विषयाचे प्रतिपादन करते (हेतु / कारण). जे असे म्हणजे चुकीचे प्रतिपादन करणारे असते, ते तसे म्हणजे सुरू करण्यास अयोग्य असते (व्याप्ति). जसे :– (आमच्या केवलाद्वैती विरोधकांनी) स्वीकारलेले शास्त्र (दृष्टान्त) ‘तस्मात् तथा’ अशा स्वरूपाचे निगमन–वाक्य कळण्यास सुलभ असल्याने ते येथे गाळले गेले आहे संक्षेपाने – आमच्या केवलाद्वैती प्रतिस्पर्ध्यांचे शास्त्र हे विमत आहे; कारण ते चुकीचे प्रतिपादन करते; म्हणून त्या शास्त्राच्या अध्ययनाचा आरंभच करू नये, असे मध्वाचार्यांना म्हणावयाचे आहे.

केवलाद्वैत शास्त्र हे विमत आहे; कारण ‘जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य आहे आणि या ऐक्याच्या ज्ञानाने मोक्ष मिळतो’ असे जे ते सांगते, ते चुकीचे आहे; ते इतरांना मान्य नाही; ते विवादास्पद आहे ज्या उपनिषदांवर केवलाद्वैत आधारलेले आहे तीही जीव आणि ब्रह्म यांतील भेद सांगताना दिसतात. तेव्हा केवलाद्वैत हे चुकीचे ज्ञान देत असल्यामुळे ते स्वीकार्य ठरत नाही; कारण अशा शास्त्राच्या अध्ययनाने मुमुक्षूला योग्य ते मोक्षसाधन कळणार नाही व पुढे त्याला मोक्ष मिळणार नाही. अशा शास्त्राचे अध्ययन करणे निरर्थक आहे; म्हणून अशा शास्त्राच्या अध्ययनाचा प्रारंभ करूच नये.

**मूळ**– न हि ब्रह्मैक्यस्य याथार्थ्यं तत्पक्षे । अद्वैतहाने; स्वरूपातिरेके । अनतिरेके स्वप्रकाशत्वात् आत्मनः सिद्ध–साधनता ।।३।।

**भाषांतर–** त्या (केवलाद्वैती पुरुषा–)च्या सिद्धांतामध्ये (तत्पक्षे) (जीवाचे) ब्रह्माशी ऐक्य हे खरे राहात नाही (तर ते खोटेच ठरते); कारण – (जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य हे ब्रह्माच्या) स्वरूपापेक्षा भिन्न आहे (स्वरूप–अतिरेके) असे मानले, तर (केवलाद्वैताला मान्य असणाऱ्या) अद्वैताची हानि (=लोप) होते; (या उलट जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य हे ब्रह्माच्या) स्वरूपापेक्षा वेगळे नसेल (अनतिरेके), तर आत्मा (=ब्रह्म) (हे तत्त्व) स्वप्रकाशी / स्वयंप्रकाशी असल्याने, (जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य हे स्वतः सिद्ध ठरते, आणि मग तेथे) सिद्धसाधनता (या दोषाची) निर्मिति होते (३).

**स्पष्टीकरण–** केवलाद्वैती जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य मानतो. त्या संदर्भात दोन पर्याय संभवतात. – (१) जीव–ब्रह्माचे ऐक्य हे ब्रह्मापेक्षा वेगळे आहे. अथवा (२) जीव–ब्रह्माचे ऐक्य हे ब्रह्माशी एकरूपच आहे. या पर्यायांतील कोणताही पर्याय स्वीकारला तरी तो पुढीलप्रमाणे दोषयुक्त होतो – समजा, जीव–ब्रह्माचे ऐक्य हे ब्रह्मापेक्षा म्हणजे ब्रह्माच्या स्वरूपापेक्षा वेगळे आहे, असे मानले तर केवलाद्वैत्याने मानलेले अद्वैत लुप्त होते. केवलाद्वैतात ब्रह्म हे एकमेव अद्वितीय सत्य तत्त्व आहे. आता, जर ब्रह्मापेक्षा वेगळे असे जीव–ब्रह्माचे ऐक्य हे आणखी एक सत्य मानले तर ब्रह्माच्या जोडीने जीव–ब्रह्म–ऐक्य हे आणखी एक सत्य येऊन, दोन सत्ये होतात. मग दोन सत्यांचे द्वैत केवलाद्वैत्याच्या गळयात पडते, आणि त्याच्या अद्वैताचा लोप होतो. आणि जर केवलाद्वैती अद्वैताची हानि होऊ देणार नसेल, तर त्याने मानलेले जीव–ब्रह्माचे ऐक्य हे अयथार्थ / मिथ्या ठरू लागते (असे खोटे ऐक्य सांगणारे अद्वैतशास्त्र कशाला अभ्यासायचे?)

आता, जर केवलाद्वैत्याने दुसरा पर्याय स्वीकारला म्हणजे जर तो म्हणेल की जीव–ब्रह्म–ऐक्य हे ब्रह्मस्वरूपापेक्षा भिन्न नाही, हे ऐक्य ब्रह्मस्वरूपीच–ब्रह्मच–आहे, तर तेथे सिद्धसाधनता हा दोष येतो. तो असा – ब्रह्म–आत्मा स्वप्रकाशी आहे. आणि जीव–ब्रह्म–ऐक्य हे जर ब्रह्मस्वरूपी असेल, तर तेही ब्रह्माप्रमाणेच स्वप्रकाशी, स्वतः सिद्ध ठरते. आता, स्वप्रकाश / स्वतःसिद्ध वस्तु ही इतर प्रमाणांनी सिद्ध करण्याची जरूरीच नाही. आणि तसे करण्याचा प्रयत्न केला तर तेथे सिद्ध–साधनता दोष येतो. सिद्ध–साधनता म्हणजे जी गोष्ट अगोदरच सिद्ध आहे, ती पुन्हा सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे. तेव्हा स्वतःसिद्ध असणारे जीव–ब्रह्म–ऐक्य पुन्हा सिद्ध करण्याचा प्रयत्न केवलाद्वैत्याने जर केला तर तेथे सिद्ध–साधनता दोष येतो.

**मूळ–** निर्विशेषत्वादात्मनः नानधिगतो विशेषः ॥४॥

**भाषांतर–** (केवलाद्‌वैत्याच्या मते) आत्मा ( = ब्रह्म) हा निर्विशेष असल्यामुळे, (बद्ध अवस्थेतील मुमुक्षूला आत्म्याचे काही) विशेष (गुण, इत्यादि) कळलेले नव्हते, असे (केवलाद्वैत्याला म्हणता येणार) नाही. (४).

**स्पष्टीकरण–** पूर्वपक्षी केवलाद्‌वैती पुढील मत मांडेल असे गृहीत धरून मध्वाचार्य त्या मताचे निरसन येथे करतात.

केवलाद्‌वैती असे म्हणेल – ब्रह्मचर्याश्रमात ब्रह्मचाऱ्याने स्वाध्याय अभ्यासताना वेदाचे अध्ययन केले होते. वेदांमध्ये उपनिषदे अंतर्भूत होतात. उपनिषदे ब्रह्माचे प्रतिपादन करतात. तेव्हा स्वाध्यायावरून ब्रह्मचाऱ्याला ब्रह्माविषयीचे सामान्यज्ञान झालेले होतेच. आता, ज्यावेळी तो मुमुक्षु होईल, त्यावेळी त्याला आमच्या केवलाद्‌वैत–शास्त्राचे अध्ययन करावे लागेल. तसे केल्यावर, त्याला ब्रह्माविषयीचे अधिक विशेष ज्ञान होईल.

यावर मध्वाचार्य म्हणतात –हे पूर्वपक्षाचे म्हणणे निरर्थक आहे. कारण असे – केवलाद्‌वैतशास्त्रानुसार, आत्मा = ब्रह्म हे निर्विशेष / निर्गुण आहे; ब्रह्माच्या ठिकाणी कोणतेच विशेष गुणधर्म नाहीत. आता, ब्रह्माजवळ जर कोणतेच गुणविशेष नसतील, तर केवलाद्‌वैतशास्त्राचे अध्ययन करून ब्रह्माविषयीचे कोणते अधिक गुणविशेष मुमुक्षूला कळून येतील ? एखाद्या वस्तूच्या ठिकाणी अनेक गुणधर्म असतील तर त्यातील काही वरवर पाहिल्यास कळतात व बाकीचे विशेष अध्ययनाने कळतात, असे म्हणता येईल. उदा.– घोडा हा चार पायांचा प्राणी आहे, हे सामान्य ज्ञान झाल्यावर, अश्वशास्त्राच्या अध्ययनाने त्याचे अधिकाधिक गुणविशेष कळून येतील, हे म्हणणे बरोबर आहे. पण असले म्हणणे ब्रह्माच्या बाबतीत संभवत नाही. अश्व ही एक मूर्त वस्तु आहे आणि तिच्या ठिकाणी अनेक गुणधर्म आहेत. पण ब्रह्म हे अमूर्त आहे आणि त्याच्या ठिकाणी कोणतेच गुणधर्म नाहीत. अशा स्थितीत केवलाद्‌वैतशास्त्राचे जरी अध्ययन केले तरी निर्विशेष अशा ब्रह्माचे कोणते विशेष कळून येणारे आहेत ? कोणतेच नाहीत; कारण ब्रह्मात विशेषच नाहीत. म्हणून केवलाद्‌वैत–शास्त्राच्या अध्ययनाने ब्रह्माचे विशेष कळून ब्रह्मज्ञान होईल हे संभवत नाही. मग जे केवलाद्‌वैतशास्त्र ब्रह्माचे विशेष ज्ञान देऊच शकत नाही त्याचे अध्ययन करण्याची आवश्यकताच उरत नाही.

**मूळ–** सिद्धत्वात् स्वरूपस्य विशेषाभावाच्च नाज्ञानं कस्यचिदावारकम् ।।५।।

**भाषांतर–** (स्वयंप्रकाशी / स्वप्रकाशी / स्वतःसिद्ध अशा ब्रह्माचे) स्वरूप हे अगोदरच सिद्ध असल्याने, आणि (निर्विशेष अशा ब्रह्माचे कोणतेच गुण–) विशेष नसल्याने, (केवलाद्‌वैत्याने मानलेले) अज्ञान हे कोणत्याच गोष्टीला आवरण घालणारे होत नाही (५).

**स्पष्टीकरण**–केवलाद्वैत्याच्या पुढील मताचा निरास मध्वाचार्य येथे करतात. केवलाद्वैत्याच्या मते–अज्ञानाजवळ आवरण–शक्ति आहे; अज्ञान हे ब्रह्मस्वरूपावर आवरण घालते. अज्ञानाच्या या आवरणाने ब्रह्माचे स्वरूप कळून येत नाही. हे अज्ञान केवलाद्वैतशास्त्राच्या अध्ययनाने दूर होते. तेव्हा अज्ञानाचा निरास होऊन. ब्रह्मज्ञान होण्यास मुमुक्षूला केवलाद्वैतशास्त्राचा अभ्यास आवश्यक आहे.

यावर मध्वाचार्य सांगतात–समजा वादासाठी अज्ञान ब्रह्माला आवरण घालते असे मानले, तर तेथे दोन विकल्प येतात–

(१) अज्ञान हे ब्रह्माचे स्वरूपावर आवरण घालते किंवा (२) अज्ञान हे ब्रह्माचे गुणविशेष आच्छादित करते. पण हे दोन्हीही विकल्प किंवा पर्याय मान्य करता येत नाहीत– यातील पहिला पर्याय स्वीकारला तर ब्रह्म हे स्वत:सिद्ध / स्वप्रकाशी / स्वयंप्रकाशी असूनही ते अज्ञानाने झाकले जाते, असा अर्थ होईल. त्या स्थितीत त्याला स्वयंप्रकाशी अथवा स्वत:सिद्ध कसे म्हणता येईल ? म्हणून ब्रह्माचे स्वरूप हे स्वत:सिद्ध / स्वप्रकाशी असल्याने, ब्रह्म हे अज्ञानाने झाकले जाते हा पहिला पर्याय मान्य करता येत नाही. आता, जर दुसरा पर्याय मानला तर ब्रह्माजवळ विशेष गुणधर्म आहेत असे मानण्याची पाळी येते. परंतु केवलाद्वैताच्या मते ब्रह्माच्या ठिकाणी कोणतेच गुण–विशेष नाहीत; कारण ब्रह्म हे निर्विशेष आहे. तेव्हा ब्रह्म हे निर्विशेष असल्याने, अज्ञानाने झाकले जाऊ शकतील असे कोणतेच गुणविशेष ब्रह्मात नाहीत. म्हणून दुसरा पर्यायही मान्य करता येत नाही.

एवं, अज्ञानाने ब्रह्माला आवरण पडते, हे मत स्वीकार्य रहात नाही. आता, जे अज्ञान ब्रह्माला आवरणच घालू शकत नाही, ते दूर करण्याची आवश्यकताच उरत नाही. मग अज्ञान दूर करण्यास केवलाद्वैत–शास्त्राचे अध्ययन करण्याचीही जरूरी उरत नाही.

**मूळ** – अनधिगत–अर्थ–गंतृ प्रमाणमिति तन्मतम् । अज्ञानासंभवादेव तन्मत-मखिलमपाकृतम् ।।६।।

**भाषांतर**–त्या (केवलाद्वैत्या) चे मत असे आहे की पूर्वी न कळलेली वस्तु (अनधिगत–अर्थ) जाणवून देणारे असे प्रमाण असते (परंतु जीवाच्या ठिकाणी) अज्ञानच संभवत नसल्यामुळे, त्या अद्वैत्याचे (शास्त्र–विषयक) संपूर्ण मतच खंडित होते. (६)

**स्पष्टीकरण**–प्रमाणाचे जे स्वरूप केवलाद्वैती मानतो, त्याला धरूनसुद्धा केवला-द्वैत–शास्त्र हे ब्रह्मज्ञानाला प्रमाण होऊ शकत नाही, असे मध्वाचार्य येथे सांगतात,

समजा, केवलाद्वैती असे म्हणू लागला–आमचे केवलाद्वैत–शास्त्र हे ब्रह्मज्ञानाला प्रमाण आहे. कारण जे ब्रह्म आत्ता ज्ञात नाही त्याचे ज्ञान करून देण्याचे कार्य आमचे शास्त्र करते आणि प्रमाण ते की जे पूर्वी माहीत नसणारी गोष्ट माहीत करून देते.

यावर कुणी म्हणेल–अद्वैतशास्त्रात ब्रह्म हे एकमेव, अद्वितीय तत्त्व आहे. तेव्हा ‘ प्रमाण ’ हे दुसरे तत्त्व केवलाद्वैत्याला कसे मानता येईल ?

यावर केवलाद्वैत्याचे उत्तर असे–पारमार्थिकदृष्टया ब्रह्म हे एकमेव अद्वितीय तत्त्व आहे. पण व्यावहारिक दृष्टीने आम्ही प्रमाणे मानतो. व्यावहारिक अवस्थेत आम्ही भाट्ट मीमांसकांचे–कुमारिलभट्टांच्या अनुयायांचे–प्रमाण–विषयक मत मान्य करतो (व्यवहारे भाट्ट–नयः) भाट्टमीमांसकांच्या मते, जे पूर्वी कळलेले नाही ते कळवून देण्याचे काम जे करते ते प्रमाण. (प्रमाण हे अज्ञात–ज्ञापक असते.) यानुसार लौकिक व्यवहारात आपणास ब्रह्म कळलेले नसते. ते कळवून देण्याचे कार्य केवल–अद्वैत–शास्त्र करते.

यावर मध्वाचार्य म्हणतात–केवलाद्वैत्याचे हे निरूपण निरुपयोगी आहे. याचे कारण असे–केवलाद्वैत सिद्धांतात जीव ब्रह्माशी एकरूप आहे. साहजिकच ज्याप्रमाणे ब्रह्माच्या ठिकाणी अज्ञान नाही, त्याप्रमाणे जीवाच्या ठिकाणीही अज्ञान संभवतच नाही. आता, जीवाजवळ अज्ञान नसल्याने, त्याला अज्ञात असे काही नाही. आणि जर जीवाला अज्ञात असे काही नाही, तर कोणत्या प्रमाणाने त्याला कोणत्या अज्ञात गोष्टीचे ज्ञान होईल ? म्हणजे केवलाद्वैतशास्त्र हे जीवाला तथाकथित अज्ञात ब्रह्माचे ज्ञान देऊ शकणार नाही. या स्थितीत केवलाद्वैतशास्त्र हे ब्रह्मज्ञानाला प्रमाणच ठरत नाही. मग या केवलाद्वैतशास्त्राच्या अध्ययनाला प्रारंभ करण्यास प्रयोजनच नाही.

**मूळ**–मिथ्यात्वे चैकस्यातत्त्वावेदकत्वमागमस्य स्यात् । सत्यता च भेदस्य ।।७।।

**भाषांतर**–(आता) जर (केवलाद्वैत्याच्या मते, जीव आणि ब्रह्म यांचे) ऐक्य हेही मिथ्या असेल, तर (ते ऐक्य सांगणारी) वेदांची वचने खोटी गोष्ट सांगणारी आहेत (अतत्त्वावेदकत्व) असा अर्थ होईल मग त्या स्थितीत (जीव आणि ब्रह्म) यांतील भेद सत्य आहे असे ठरते (७).

**स्पष्टीकरण**–समजा, आता केवलाद्वैती असे म्हणू लागला–केवलाद्वैतशास्त्र हे अज्ञानयुक्त जीवाला ब्रह्माचे ज्ञान करून देते. जीवाजवळ अज्ञान आहे, कारण तो ब्रह्माशी एकरूप नाही; जीव–ब्रह्माचे ऐक्य मिथ्या आहे; ते ऐक्य खरे नसून खोटे

आहे. म्हणजे जीवाला अज्ञानी ठरविण्यास, जीव–ब्रह्माचे ऐक्य हे खोटे आहे, असे म्हणावयास हवे.

केवलाद्वैत्याचे वरील म्हणणे मान्य केल्यास, त्याच्यावर दोन अनुचित गोष्टी मानण्याचा प्रसंग येतो. तो असा–

(१) वेदांतील–उपविषदांतील–काही वाक्ये जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य सांगतात. उदा०–तत्त्वमसि, अहं ब्रह्मास्मि, इत्यादी. आता जर जीव–ब्रह्माचे ऐक्य मिथ्या असेल तर त्यांचे ऐक्य सांगणारी वेदातील वाक्ये खरे ज्ञान देत नाहीत, असा अर्थ होईल. म्हणजे आगम / वेद ब्रह्मज्ञानाला प्रमाण नाहीत, असा अर्थ होतो.

(२) जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य खोटे असेल, तर ते दोघे भिन्न आहेत, असा अर्थ होतो. म्हणजे जीव आणि ब्रह्म यांतील भेद सत्य आहे असे निष्पन्न होते. कारण ऐक्य व भेद हे परस्पर–विरोधी आहेत. त्यातील एक खरा असल्यास, दुसरा खोटा ठरतो व एक खोटा असेल तर दुसरा खरा ठरतो. तेव्हा जीव-ब्रह्माचे ऐक्य खोटे असेल तर जीव आणि ब्रह्म भिन्न आहेत हे खरे होते; म्हणजे त्यांच्यातील भेद सत्य ठरतो.

० ० ०

(जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य हा केवलाद्वैतशास्त्राचा विषय होऊ शकत नाही, असे मध्वाचार्यांनी येथपर्यंत दाखवून दिले. आता यापुढे ते केवलाद्वैतशास्त्राला प्रयोजन, अधिकारी व संबंध हे अनुबंध नाहीत, असे दाखवून देतात.)

**मूळ**-एवमेव प्रयोजनमपि निरस्तम् । स्वरूपत्वात् मोक्षस्य पूर्वमेव सिद्धत्वात् ॥८॥

**भाषांतर**–(आणि अस्ता समजा जर जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य अगोदरच असेल तर) याप्रकारे (केवलाद्वैतशास्त्राला काही) प्रयोजन आहे (हे मतही) निरस्त होते कारण मोक्ष म्हणजेच (ब्रह्म–) स्वरूप होणे असे असल्यामुळे, मोक्ष हा अगोदरच सिद्ध झालेला आहे (८).

**स्पष्टीकरण** – ( मागे (७) मध्ये, केवलाद्वैत्याने जीव–ब्रह्माचे ऐक्य खोटे मानल्यास काय होते ते मध्वाचार्यांनी सांगितले. केवलाद्वैत्याने जीव–ब्रह्माचे ऐक्य सत्य मानल्यास काय होते ते मागे (३) मध्ये मध्वाचार्यांनी दाखविले. हे ऐक्य सत्य मानल्यास आणखी काय प्रसंग ओढवतो, ते मध्वाचार्य प्रस्तुत (८) मध्ये सांगत आहेत.)

समजा, जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य सत्य आहे याचा अर्थ असा की जीव हा ब्रह्मस्वरूपच आहे. ब्रह्मस्वरूप असणे म्हणजेच ब्रह्मभाव. आणि ब्रह्मभाव म्हणजेच

मोक्ष, (ब्रह्मभावश्च मोक्षः), असे केवलाद्वैती म्हणतो. याचा अर्थ असा की (केवलाद्वैतशास्त्राचे अध्ययनापूर्वीच) जीवाला मोक्ष प्राप्त झाला आहे; कारण जीव ब्रह्मस्वरूप आहे याचाच अर्थ तो मुक्त आहे. या स्थितीत केवलाद्वैत शास्त्राला मोक्ष हे प्रयोजनच उरत नाही. म्हणजें असे – मोक्षाचे स्वरूप, साधन, इत्यादि सांगणें हे केवलाद्वैतशास्त्राचें प्रयोजन मानले जाते. आता ज्या जीवांसाठी मोक्ष हे प्रयोजन केवलाद्वैत शास्त्र सांगणार आहे, ते जीव अगोदरच ब्रह्मस्वरूप असल्याने मुक्त आहेत. त्या स्थितीत केवलाद्वैतशास्त्राला प्रयोजनच उरत नाही. (आणि ज्या केवलाद्वैतशास्त्राला प्रयोजनच नाही, ते कशाला अभ्यासावयाचे)?

मूळ– अज्ञानासंभवेन चतुर्थ-प्रकार-अभावात् पंचम-प्रकारतापि निरस्ता ॥९॥

भाषांतर– (ब्रह्मरूप अशा जीवाच्या बाबतीत) अज्ञान संभवतच नसल्यामुळे, चतुर्थ प्रकाराचा अभाव होतो; त्यामुळें (मोक्षाचा) पाचवा प्रकार आहे, हे म्हणणेही खंडित होते (९).

स्पष्टीकरण– काही केवलाद्वैती वस्तूंचे चार प्रकार मानून मोक्षाचा पाचवा प्रकार मानतात. या म्हणण्याचे खंडन मध्वाचार्य येथे करीत आहेत. केवलाद्वैती सांगतात ते चार प्रकार असे :– (१) काही वस्तु सत् आहेत. सत् ते की जे तीनही काळांत असते आणि जे अविकारी असते. उदा. ब्रह्म. (२) काही वस्तु असत् आहेत. ज्या वस्तु अस्तित्वातच नसतात त्या असत्. उदा– शशशृंग, इत्यादि. (३) काही वस्तु सदसत् (सत्–असत्) असतात. ज्या वस्तु काही काळ असतात व नंतर नसतात, त्या. उदा.– उत्पत्तीनंतर घट काही काळ असतो व तो नाशानंतर नसतो. (४) काही वस्तु सदसदनिर्वचनीय असतात. ज्या वस्तु वरील तीन प्रकारांत मोडत नाहीत त्या. उदा– शुक्तीवर भासणारे रजत, रज्जूवर भासणारा सर्प. (५) मोक्ष हा वरील कोणत्याही चार प्रकारांत बसत नाही. म्हणून मोक्षासाठी स्वतंत्र पाचवा प्रकार आहे.

यावर मध्वाचार्यांचे म्हणणे असे :– केवलाद्वैत्याने सांगितलेले वस्तूंचे पहिले तीन प्रकार हे कुणालाही मान्य होणासारखे आहेत. परंतु सत् व असत् या शब्दांनी वर्णन करता न येणारा असा 'सदसदनिर्वचनीय' हा चौथा प्रकार असूच शकत नाही. ब्रह्मावर भासणारे जग, शुक्तीवर भासणारे रजत इत्यादि जीवाच्या ठिकाणच्या अज्ञानाने संभवतात. पण ब्रह्मरूप जीवाच्या ठिकाणी अज्ञान संभवतच नसल्याने, सदसदनिर्वचनीय हा चौथा प्रकार असू शकत नाही. आणि जर चौथा प्रकारच नसेल तर पाचवा प्रकार कोठून येणार ? जसे :– आकाश वगैरे पाच महाभूते आहेत; सहावे महाभूत नाही; मग सातवे महाभूत कुठे असणार ? तेव्हा मोक्षाचा पाचवा प्रकार हे संभवतच नाही.

**मूळ**- विषय–प्रयोजन–अभावादेव अधिकारी च तदभावादेव संबंधोऽपि ॥१०॥

**भाषांतर**- (केवलाद्वैत–शास्त्राला, मागे पाहिल्याप्रमाणे) विषय आणि प्रयोजन हे दोन्ही नसल्यामुळे (त्या शास्त्राच्या अध्ययनाला) कोणी अधिकारी वा पात्र पुरुष रहात नाही आणि (या तिघांचाही) अभाव असल्यामुळे, (योग्य तो) संबंधही रहात नाही (१०).

**स्पष्टीकरण**- जीव हा ब्रह्मरूप असल्यास, केवलाद्वैत शास्त्राला विषय व प्रयोजन हे रहात नाहीत. हे (२) ते (९) या वरील खंडांत दाखवून झाले. आता ज्या शास्त्राला विषयही नाही आणि प्रयोजनही नाही अशा शास्त्राला अध्ययन करू इच्छिणारा अधिकारी पुरुष असणार नाही हे स्पष्टच आहे.आणि हे तीनही अनुबंध या केवलाद्वैतशास्त्राला नसल्याने संबंध हा अनुबंधही असू शकत नाही.

अशाप्रकारे, विषय, संबंध, प्रयोजन व अधिकारी नसणारे केवलाद्वैतशास्त्र हे नसल्यातच जमा आहे अशा शास्त्राचा अभ्यास सुरू करता येणार नाही हे उघड आहे.

यापर्यंत केवलाद्वैतशास्त्राच्या अध्ययनाचा आरंभ करण्याची जरूरी नाही हे सांगून झाले. यापुढे (११) ते (१६) या खंडांत, आपले द्वैतवादी–मतच श्रुति–स्मृतींना मान्य आहे, असे मध्वाचार्य त्यांतील उतारे उद्धृत करून दाखवितात. त्यासाठी ते कठ उपनिषद्, भगवद्गीता व ब्रह्मसूत्र उद्धृत करतात. प्रास्ताविक भागात म्हटल्याप्रमाणे विष्णु हा सर्वोत्तम आहे आणि पाच प्रकारचा भेद सत्य आहे, हे द्वैतवादाचे मुख्य सिद्धांत आहेत. तेच श्रुति–स्मृतीत आहेत, असे मध्वाचार्य यापुढे सांगतात.

**मूळ**– द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥
यस्मात्क्षरमतीतोऽहं अक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥११॥

**भाषांतर**- (विश्वात) क्षर व अक्षर असे हे दोन पुरुष आहेत. सर्व भूते म्हणजे क्षर पुरुष, आणि कूटस्थाला अक्षर असे म्हटले जाते. (या दोहोंपेक्षा) वेगळा असा अन्य उत्तम पुरुष आहे; त्याला परमात्मा असे म्हटले जाते. आणि तो अव्यय, परमात्मा असा ईश्वर तीन जगांच्या समूहात शिरून (म्हणजे व्यापून) त्यांना धारण करतो ज्या अर्थी मी (= कृष्ण, सर्वश्रेष्ठ ईश्वर) क्षराच्या पलीकडे आहे तसेच

अक्षरापेक्षा उत्तम आहे, त्याअर्थी मी (= सर्वश्रेष्ठ ईश्वर) जगात आणि वेदात पुरुषोत्तम म्हणून प्रसिद्ध आहे (११).

**स्पष्टीकरण**– येथे मध्वाचार्यांनी भगवद्गीता १५.१६-१८ श्लोक उद्धृत केले आहेत. भगवद्गीतेत कृष्ण हा सर्वोच्च ईश्वर आहे, ही भूमिका आहे. या श्लोकांत मध्वाचार्यांच्या मते – क्षर पुरुष म्हणजे ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंतची सर्व भूते. अक्षर पुरुष म्हणजे प्रकृति / लक्ष्मी / रमा; ती विष्णूची सहचरी आहे; ती क्षर पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे. आणि उत्तम पुरुष / पुरुषोत्तम म्हणजे विष्णु. आणि या श्लोकांत असे सांगितलेले आहे की विष्णु हा सर्व भूतांपेक्षा, प्रकृतीपेक्षा वेगळा व श्रेष्ठ आहे. म्हणजे विष्णु हा सर्वश्रेष्ठ व त्याचा इतरांपासूनचा भेद सांगितलेला आहे.

**मूळ**– यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।
स सर्वविद् भजति मां सर्वभावेन भारत ॥
इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद् बुद्ध्वा बुद्धिमान् स्यात् कृतकृत्यश्च भारत ॥१२॥

**भाषांतर**– हे भरतकुलोत्पन्न अर्जुना, मोहात न सापडता जो कोणी मला म्हणजे पुरुषोत्तमाला जाणतो तो सर्ववेत्ता होतो आणि तो अत्यंत मनःपूर्वक माझे भजन-पूजन (= भक्ति) करतो. हे निष्पाप व भरतकुलोत्पन्न अर्जुना, हे सर्वात गुह्य असे शास्त्र मी तुला सांगितले आहे. हे जाणून बुद्धिमान् माणूस कृतकृत्य होतो. (१२).

**स्पष्टीकरण**– येथे मध्वाचार्यांनी भगवद्गीता १५.१९–२० हे श्लोक उद्धृत केले आहेत. त्यांमध्यें पुरुषोत्तम अशा ईश्वराचे ज्ञान व भक्ती आवश्यक आहेत असे म्हटलेले आहे. भक्ति करणारे जीव ईश्वरापेक्षा भिन्न आहेत हे स्पष्ट होते; तसेच जीवांनी ईश्वराचे ज्ञान मिळविणे व ईश्वराची भक्ति करणे आवश्यक आहे यावर भर आहे. तसे केल्यानेच जीव सर्ववित् व कृतकृत्य होतो. हे सर्व गुह्यतम शास्त्र आहे. म्हणजे हे सांगण्यास गुह्यतम शास्त्राला अवकाश आहे.

कृतकृत्य होणें म्हणजे जीवनाचे ध्येय संपादन करून जीवनाचे सार्थक करून घेणे. मोक्षाची प्राप्ति करून घेण्यात जीवनाचे सार्थक आहे. गुह्यतम शास्त्र कळल्यावर माणूस कृतकृत्य होतो म्हणजे मोक्ष प्राप्त करून घेतो. यावरून हे स्पष्ट होते की या शास्त्राच्या अध्ययनापूर्वी त्याला मोक्ष मिळालेला नव्हता. शास्त्राध्ययनाने ईश्वराचे ज्ञान झाल्यावर, ईश्वराची भक्ति करून जीवाला मोक्ष प्राप्त होतो. अशाप्रकारे

भेदाधिष्ठित द्वैतशास्त्र हेच जीवाच्या मोक्षाला उपयोगी ठरते. याचाच गर्भितार्थ असा की केवलाद्वैत्याचे अभेदाधिष्ठित शास्त्र हे मोक्षाला उपयोगी पडणारे नाही

**मूळ–** इंद्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान् परः ॥
महतः परमव्यक्तं अव्यक्तात् पुरुषः परः ।
पुरुषान्न परं किंचित् सा काष्ठा सा परा गतिः ॥१३॥

**भाषांतर–** (इंद्रियांचे) विषय हे इंद्रियांपेक्षा पर आहेत; विषयांपेक्षा मन पर आहे; मनापेक्षा बुद्धि पर आहे; बुद्धीपेक्षा महान् आत्मा पर आहे; महत्पेक्षा अव्यक्त पर आहे; अव्यक्तापेक्षा पुरुष पर आहे; पुरुषापेक्षा पर काही नाही; तो पुरुष म्हणजेच अंतिम स्थिति / अवस्था आणि श्रेष्ठ गति आहे (१३)

**स्पष्टीकरण–**हे दोन श्लोक म्हणजे कठ उपनिषद् १.३.१०-११ आहेत. त्यामध्ये काही पदार्थांचे तारतम्य वा श्रेष्ठ–कनिष्ठ–भाव सांगितलेला आहे. त्या सर्वांत पुरुष = उत्तम पुरुष = ईश्वर = विष्णु श्रेष्ठ आहे. यावरून विष्णु हाच सर्वोत्तम / सर्वश्रेष्ठ आहे आणि तो त्या सर्वांपेक्षा भिन्न आहे हे कळून येते. म्हणजे वस्तु–वस्तूंत भेद आहे व तो सत्य आहे; जीव व ईश्वर यात भेद असून तो सत्य आहे व ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे, हे द्वैतमतच या श्लोकांत आहे.

**मूळ–**भूम्नः क्रतुवज्ज्यायस्त्वं तथा च दर्शयति ॥१४॥

**भाषांतर–**संपूर्ण अशा (अग्नी)चे (भूम्नः) उपासन हे प्रधान आहे (ज्यायस्त्व) जसे–यज्ञामध्ये (क्रतुवत्) असते; तीच गोष्ट श्रुति दाखवते (१४)

**स्पष्टीकरण-**हे वाक्य म्हणजे ब्रह्मसूत्र ३.३.५७ आहे. या सूत्राचा भावार्थ असा आहे–यज्ञामध्ये यज्ञाच्या अंगांचा प्रयोग स्वतंत्र नसून तो मुख्य यज्ञाला गौण असतो. यज्ञ हा सांगोपांगच व्हावा लागतो; तसे करणे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे संपूर्ण अग्नीची उपासना महत्त्वाची आहे आणि तेच श्रुतीने सांगितले आहे.

मध्वाचार्यांच्या मते, अग्नि म्हणजे विष्णु; विष्णु हा भूमन् म्हणजे संपूर्ण आहे; त्याच्याजवळ अनंत कल्याण-**गुण** आहेत. जीव मात्र तसा नाही. जग व जीव यापेक्षा भिन्न असणारा विष्णु/ईश्वर हा संपूर्ण म्हणजे सर्वश्रेष्ठ आहे, हे श्रुतीवरून कळते.

**मूळ–**इति विष्णोः सर्वोत्तमत्वमेव शास्त्रार्थत्वेन श्रुत्या चाभिहितम् ॥१५॥

**भाषांतर**–अशाप्रकारे विष्णु हा सर्वोत्तम आहे आणि (वेदान्त–) शास्त्राचा अर्थ ( = उद्देश, प्रयोजन) आहे, असे भगवंताने ( = कृष्णाने) सांगितले आहे आणि तेच श्रुतीनेही सांगितले आहे (१५).

**स्पष्टीकरण**–वरील अवतरणांवरून असे कळते की विष्णु हा सर्वोत्तम आहे. तेच भगवान् कृष्ण व श्रुति सांगत आहेत; ते सांगणे हेच त्यांचे प्रयोजन आहे. तेव्हा श्रुति व स्मृति या जीव आणि ब्रह्माचे ऐक्य सांगतात हे केवलाद्वैतशास्त्राचे म्हणणे खोटे ठरते. मग असे खोटे सांगणारे केवलाद्वैतशास्त्र कशाला अभ्यासावयाचे ?

मूळ–इति सर्वज्ञ–मुनिना मायावाद–तमोऽखिलम् । निरस्तं तत्त्ववादेन सतां संशय–नुत्तये ॥१६॥

**भाषांतर**–अशाप्रकारे सज्जन माणसांच्या (मनातील) संशयांचा उच्छेद करण्यासाठी (संशय–नुत्तये), सर्वज्ञ अशा मुनीने ( = मध्वाचार्यांनी) वस्तूंचे सत्य स्वरूप (तत्त्व) सांगणारे युक्तिवाद करून, मायावाद–रूपी संपूर्ण अंधकार दूर केला आहे (१६).

**स्पष्टीकरण**-अशाप्रकारे मी मायावादाचे खंडन केले आहे, असे मध्वाचार्य सांगतात. या श्लोकात सर्वज्ञ मुनि शब्दाने मध्वाचार्य अभिप्रेत आहेत.

मूळ–नास्ति नारायण समं न भूतं न भविष्यति । एतेन सत्य–वाक्येन सर्वार्थान् साधयाम्यहम् ॥१७॥

**भाषांतर**–नारायणाशी = विष्णूशी तुल्य असे (आत्ता वर्तमानकाळात) काही नाही, पूर्वी (भूतकाळात) काही झाले नाही आणि यापुढेही (भविष्यकाळात) काही होणार नाही. हे सत्य वाक्य सांगून मी सर्व अर्थ साधले आहेत (१७).

**स्पष्टीकरण**–विष्णूशी तुल्य असे तीनही काळांत काहीही नाही, हे मध्वाचार्यांचे सत्य वाक्य आहे, या एकाच सत्य वाक्यावरून त्यांच्या तत्त्वज्ञानातील सर्व गोष्टी सिद्ध होतात असे त्यांचे म्हणणे आहे. या वाक्यावरून पुढील सिद्धांत गर्भितपणे अभिप्रेत दिसतात–

१) जग व जीव सत्य आहेत आणि ते परस्परापेक्षा भिन्न आहेत.

२) विष्णूशी समान असे त्यांमध्ये केव्हाही काहीही नाही.

३) विष्णु सर्वश्रेष्ठ आहे.

मोक्षप्राप्तीसाठी या विष्णूचे ज्ञान व भक्ति आवश्यक आहेत. त्यासाठी द्वैतशास्त्रच उपयोगी आहे. केवलाद्वैतशास्त्र तसे नाही. म्हणून त्या केवलाद्वैतशास्त्राच्या अध्ययनाचा आरंभ करणे आवश्यक नाही.

या अंतिम श्लोकात नारायणाची सर्वोत्तमत्व सांगून मध्वाचार्य आपल्या मायावादखंडन या लहानशा ग्रंथाचा समारोप करतात.

४, आद्यश्री अपार्टमेंट
सेनामंदिर रोड, गांवभाग,
सांगली

के. वा. आपटे